# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 11 August 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ११ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

वक्फ सुधारणा विधेयक-२०२४ चा आढावा घेण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या समारोपापर्यंत आपला अहवाल देईल, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमांवरच्या संवादाद्वारे दिली आहे. या प्रकरणी सुनावणीची तारीख संयुक्त संसदीय समिती जाहीर करेल आणि फक्त मुस्लिम संघटनाच नव्हे तर या प्रकरणी सकारात्मक योगदान देऊ शकणाऱ्या कोणत्याही संघटना किंवा व्यक्तींचं समितीच्या प्रक्रियेत स्वागत असेल, असं रिजिजू म्हणाले. हे विधेयक भविष्यवेधी असल्याचं त्यांनी नमूद केलं. मुस्लिम समुदायाच्या कल्याणासाठी सरकारनं हे पाऊल उचलल्याचं ते म्हणाले. सरकारनं हे विधेयक संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडलं होतं आणि ते पुढच्या छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं.

****

भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते अभिनव बिंद्रा यांना प्रतिष्ठित ऑलिम्पिक ऑर्डर हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. काल पॅरिस इथं आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडून याचं वितरण करण्यात आलं. बिंद्रानं २००८ बीजिंग ऑलिंपिक मध्ये दहा मीटर एअर रायफल स्पर्धेत भारतासाठी पहिलं वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्ण पदक जिंकलं. यासह एकूण दीडशे वैयक्तिक पदकांची अभिनवनं पटकावली आहेत.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप होत आहे. रात्री साडेबारा वाजता हा सोहळा होईल. भारतातर्फे हॉकीपटू पी. आर. श्रीजेश आणि पिस्तुल नेमबाज मनु भाकर या सोहळ्यात प्रमुख ध्वजधारक खेळाडू असणार आहेत.

स्पर्धेत भारतानं एका रौप्य पदकासह पाच कांस्य पदकं जिंकली. यामध्ये आधिच्या ऑलिम्पिकमधील सुवर्ण पदकानंतर लागोपाठ या ऑलिम्पिकमध्ये रौप्य पदक पटकावणारा भालाफेकपटू निरज चोप्रा, स्वतंत्र भारतातून एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन तसंच पिस्तुल नेमबाजीत महिलेनं पहिल्यांदाच यासह नेमबाजीच्या सांघिक प्रकारात पहिल्यांदाच अशी कास्यपदकांची कमाई करणारी मनु भाकर. नेमबाजी सांघिक प्रकरात सरबज्योत सिंगनही पदक मिळवून देण्यात मोलाचं योगदान दिलं. तर हॉकीत याआधीच्या आणि आताच्या असं लागोपाठ दोनवेळा कास्य पदक आपल्या नावे झालं. यासह कुस्तीमध्ये अमन सेहरावत तर रायफल नेमबाजीत महाराष्ट्राच्या स्वप्निल कुसाळेनं मिळवलेलं कांस्य पदक. अशाप्रकारे भारताची यशस्वी कामगिरी झाली.

दरम्यान, स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाटला वजनामुळे अपात्र केल्याप्रकरणी दाखल याचिकेवर आंतरराष्ट्रीय क्रिडा न्यायालय येत्या मंगळवारी १३ तारखेला निकाल सुनावणार आहे. याचिकेत विनेशनं संयुक्तरित्या रौप्य पदकाची मागणी केली आहे.

आता यानंतर २०२८ मध्ये ऑलिंपिक क्रिडा स्पर्धा लॉस एंजेलिस इथं खेळली जाणार आहे.

****

देशाचे माजी परराष्ट्र मंत्री नटवर सिंह यांचं रात्री उशिरा निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. भारतीय परराष्ट्र सेवा-आय.एफ.एस. म्हणून काम केल्यानंतर काँग्रेस पक्षातून त्यांनी आपली संपूर्ण राजकीय कारकीर्द घडवली.

****

जम्मू काश्मीरमधील आनंतनाग जिल्ह्यातील कोकरनाग भागात दहशतवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत दोन जवान शहीद झाले. चकमकी दरम्यान,  गंभीर जखमी जवानांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. संरक्षण विभागाच्या प्रवक्त्यांनी ही माहिती दिली. या चकमकीत दोन नागरिकही जखमी झाले. कालपासून सुरू झालेली ही दहशतवाद्यांसोबतची चकमक आजही सुरूच असल्याचं वृत्त आहे.

****

जम्मू-कश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात आयोजित सांस्कृतिक उत्सव कशूर रिवाजमध्ये दहा हजार युवतींनी सहभागी होत कश्मीरी लोकनृत्याचं विक्रमी सादरीकरण केलं. या नृत्याची नोंद युनिवर्सल रिकॉर्ड फोरममध्ये झाली आहे. हे लोकनृत्य ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजीत करण्यात आलं होतं.

****

ज्येष्ठ पत्रकार रमेश झवर यांना यंदाचा आचार्य प्रल्हाद केशव अत्रे स्मृती  पुरस्कार जाहिर झाला आहे. झवर विविध वृत्तपत्रांमधून पन्नास वर्षांहून अधिक काळ पत्रकारितेत सक्रिय आहेत. त्याचं आजही समाज माध्यमांवर माहितीपूर्ण लिखाण चालू आहे.

****

पुरोगामी महाराष्ट्रात आजचं राजकारण दुर्दैवानं गढूळ झालं आहे. अशा वेळी राज्याची सामाजिक वीण विस्कटू नये म्हणून शिक्षण क्षेत्रातील मंडळींनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी केलं. ते छत्रपती संभाजीनगर शहरात काल रात्री आयोजित क्रीडा आणि शिक्षणक्षेत्रात मोलाची कामगिरी करणारे डॉक्टर फुलचंद सलामपुरे यांच्या सेवागौरव कार्यक्रमात बोलत होते. समाज जाती-जातीमध्ये विखुरला जात असल्याची खंतही आ.चव्हाण यांनी व्यक्त केली.

****

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा आणि तालुका कृषी अधिकारी वाशिम कार्यालयाच्या वतीनं तहसील कार्यालयाच्या सभागृहात रानभाजी महोत्सवाचं आयोजन उद्या सकाळी ११ वाजता करण्यात आल आहे. या महोत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

****